Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## धनंजय मुंडेंकडे आर्थिक लाभाचे पद;त्यांचा ताबडतोब राजीनामा घ्या-अंजली दमानिया

बीड , (दिव्य न्युज) :- सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे आर्थिक लाभाचे पद असल्याचा दावा करत ताबडतोब त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे. महाजेनको ही कंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पूर्ण मालकीची उपकंपनी आहे. त्यामुळे मंत्रिपदावर असताना धनंजय मुंडे या कंपनीतून आर्थिक लाभ कसा मिळवू शकतात? असा सवाल अंजली दमानिया यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी पुरावे मिळेपर्यंत धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणार नाही अशी भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्याकडे आर्थिक लाभाचे पद असल्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

# वाल्मिक कराडच्या जामिनावरील सुनावणी लांबणीवर

## संतोष देशमुख हत्या प्रकरण:२० तारखेला होणार पुढची सुनावणी



### इतर आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी सध्या एसटीच्या ताब्यात आहेत. या सर्व आरोपींची एसआयटी कोठडी आज संपली आहे. या आरोपींना आज बीड येथील जिल्हा न्यायालयात व्हिसीद्वारे हजर केले गेले. तसेच एसआयटीकडून या सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार या आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, सिद्धार्थ सोनवणे या तिघांची १४ दिवसांची कोठडी आज संपली. तर प्रतिक घुले, महेश केदार, जयराम चाटे यांची देखील बारा दिवसांची कोठडी संपत असल्याने या सर्व आरोपींना व्हिसीच्या माध्यमातून न्यायालयामध्ये हजर केले गेले. सध्या या सर्व आरोपींना वेगवेगळ्या पोलिस ठाण्यातला लॉकअप मध्ये ठेवण्यात आले होते. मात्र सुरक्षेच्या कारणास्तव यासाठीच्या पथकाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. त्यामुळे त्यांना प्रत्यक्ष हजर न करता विशेष व्हिसीद्वारे न्यायालयात हजर केले गेले.

यामधील दोन आरोपी हे तलवाडा पोलिस ठाण्यात आहेत. तर दोन गेवराई तर दोन माजलगाव पोलिस ठाण्यामध्ये आहेत. या सर्व आरोपींना या पोलिस ठाण्यामधूनच व्हिसीद्वारे न्यायालयात हजर केले आहे. मात्र, या सुनावणीत न्यायालयाने या आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. यामध्ये सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे या प्रकरणातील मुख्य आरोपी असून सिद्धार्थ सोनवणे याने संतोष देशमुख यांचे लोकेशन सांगितले असल्याचा आरोप आहे.



संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणीच्या गुन्ह्यात अटक असलेला वाल्मीक कराड याला देखील मकोका लावण्यात आला आहे. त्यानंतर वाल्मीक कराडला सात दिवसांची कोठडी सुनवण्यात आली आहे. मात्र वाल्मीक कराडला जिल्हा सत्र न्यायालयाने कोठडी सुनावल्यानंतर कोर्टामध्ये लगेच जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जाला सीआयडी पथकाकडून कोर्टात आव्हान देण्यात आले आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी वाल्मीक करडचा असलेला संबंध? याची चौकशी करायची असल्याने त्याला जामीन देण्यात येऊ नये अशी विनंती सीआयडीने न्यायालयाकडे केली आहे. यात जामीन अर्जावर आज केजच्या जिल्हा व सत्र न्यायालया समोर सुनावणी होणार होती. त्यावर होणारी सुनावणी पुन्हा लांबली आहे.




### धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढल्या?

## कृषी साहित्य खरेदीप्रकरणी कोर्टात सुनावणी

### वाढीव दर आकारल्याचा याचिकाकर्त्याचा दावा

बीड , (दिव्य न्युज):- बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणावरून राज्याचे विद्यमान अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत असतानाच आता आणखी एका गोष्टीमुळे मुंडे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याआधीच्या सरकारमध्ये (शिंदे सरकार) कृषीमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी घेतसेल्या एका निर्णयावर प्रश्न उपस्थित केले आहेत. मुंडे कृषीमंत्री असताना कोणत्या आधारावर त्यांनी कृषी साहित्य खरेदीच्या धोरणात बदल केले? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे. तसेच पुढील दोन आठवड्यात यासंदर्भात स्पष्टीकरण देखील मागितलं आहे. राज्यात कृषी साहित्य खरेदीसाठीची डीबीटी योजना मुंडे कृषीमंत्री असताना बंद करण्यात आली आणि कृषी साहित्य खरेदी करून शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी सरकारने १०३ कोटी रुपयांचा



## नांदेडचे बीड करायचा नाही, मुंडे बंधू-भगिनी पालकमंत्री नको!

### ध्वजारोहण करू देणार नाही; सकल मराठा समाजाचा इशारा

बीड , (दिव्य न्युज):- आम्हाला नांदेडचा बीड करायचा नाही. त्यामुळे धनंजय मुंडे, पंकजा मुंडे आमच्याकडे पालकमंत्री नकोत, अशी स्पष्ट भूमिका सकल मराठा समाजाने घेतली आहे. नांदेडकरांचा विरोध डावलून मुंडे बंधू-भगिनीला पालकमंत्री केल्यास येत्या २६ जानेवारीला त्यांना ध्वजारोहण करू दिले जाणार नाही, असा इशाराही सकल मराठा समाजाने दिला आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अमानुष हत्येच्या निषेधार्थ नांदेड येथे शनिवार, १८ जानेवारी रोजी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र आरोपींना अटक करून 'मकोका' लावण्यात आल्यामुळे हा मोर्चा स्थगित करण्यात आल्याची माहिती मराठा आंदोलक श्याम पाटील वडजे यांनी





पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, अवादा कंपनीचा एक कामगार केजमध्ये चांदणी बारसमोर मृतावस्थेत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

## समोरील वाहनाच्या प्रकाशझोताने दुचाकीवरील नियंत्रण सुटले

### ट्रॉलीवर धडकून सरपंचपुत्राचा मृत्यू

केज ( बीड) , (दिव्य न्युज):- शेतातील पिकाला पाणी देऊन घराकडे परतत असताना रस्त्याच्या कडेला उभ्या नादुरुस्त ट्रॅक्टर ट्रॉलीवर दुचाकी धडकून अपघात झाल्याची घटना शुक्रवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास ढाकेफळ



## हॉलतिकिटवरही आता जातीचा उल्लेख

### शिक्षण तज्ज्ञ, शिक्षकांचा बोर्डाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणार्या फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दाहवी- बारावीच्या परीक्षेची प्रवेशपत्राबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. दहावी बारावी बोर्ड परीक्षेच्या हॉल तिकिटावर आता विद्यार्थ्यांच्या जात प्रवर्गाचा उल्लेख करण्यात आल्याचे समोर आले आहे. हॉल तिकीटवर केल्या गेलेल्या जात प्रवर्गाच्या उल्लेखानंतर शिक्षण तज्ज्ञ आणि शिक्षकांकडून बोर्डाच्या या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शाळेत विद्यार्थ्यांच्या जातीची नोंद नेमकी का झाली आहे हे पालकांना आणि विद्यार्थ्यांना कळावे, यासाठी हॉल तिकीटवर जात प्रवर्गाचा रकाना असल्याचा बोर्डाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. मात्र एकीकडे शाळेच्या दाखल्यावर जातीची नोंद हटवण्याची मागणी होत असताना बोर्डाकडून जात प्रवर्ग हॉल तिकीट वर दिला जात असल्याचं समोर आले आहे. यंदाचे वर्षी दहावी, बारावी बोर्डाच्या हॉल तिकीटमध्ये काही बदल करण्यात आले आहेत आणि त्यामध्येच विद्यार्थी कोणत्या जातीच्या प्रवर्गात मोडतो हे स्पष्ट हॉल तिकीटवर असलेल्या रकान्यात दिसत आहे.

बारावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट वितरित करायला

## वाल्मिकक कराडला धनंजय मुंडेंचं संरक्षण

### संदीप क्षीरसागरांचा आरोप

बीड , (दिव्य न्युज):- वाल्मीक कराड याला पहिल्या दिवसापासून संरक्षण आहे. माध्यमात काही दिवसापूर्वी त्यांच्याकडे अमेरिकेतील सीम कार्ड असल्याचं समोर आलंय, त्यामुळे त्यांचे कॉन्टक्ट कुठेपर्यंत आहेत हे लक्षात येते. त्यांना अटक व्हायला किती उशीर झाला? अटक होऊन सुद्धा कटकारस्थानमध्ये अजूनही नाव घेतलेले नाही, एक तर मास्टरमाईंड वाल्मीक कराड आहे. वाल्मीक कराड यांना मंत्री धनंजय मुंडे यांचे संरक्षण आहे हे स्पष्ट दिसून येत आहे, असा आरोप आमदार संदीप क्षीरसागर यांनी केला. बीडमध्ये आज आमदार संदीप क्षीरसागर यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी मंत्री धनंजय



### धनंजय मुंडेंच्या मामींनी घेतली देशमुख कुटुंबीयांची भेट

## मुंडेंनी मंत्रिपदाचाच नव्हे तर आमदारकीचाही राजीनामा द्यायला हवा

बीड , (दिव्य न्युज):- सारंगी महाजन यांनी मस्साजोगमध्ये जात संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आहे. धनंजय देशमुख यांच्यासह कुटुंबीयांची विचारपूस करत प्रकरणावर चर्चा केली आहे. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचाच नव्हे तर आमदारकीचाही राजीनामा द्यायला हवा असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मीक कराड यांच्यावर आरोप होत आहे. तर राजकीय नेत्यांकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे.



अशातच धनंजय मुंडेंच्या मामी सारंगी महाजन यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्या आहेत.

सारंगी महाजन म्हणाल्या की, माझ्या केसमध्ये देखील गोविंद मुंडेंचे वाल्मीक कराड याच्याशी संबंध आहेत आणि त्याचे धनंजय मुंडेसोबत आहे. म्हणजे यात धनंजय मुंडे यात मिक्स आहे. पंकजा पण तेवढीच

## ऑनलाईन गेमध्ये पैसे हरल्यामुळे खून

### औरंगाबाद खून प्रकरणाचा पोलीसांकडून उलगडा

वडवणी, (दिव्य न्युज):- वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील प्रदिप विश्वनाथ निपटे हा १९ वर्षीय तरुण छ.संभाजी नगर येथे देवगिरी काँलेजला बीसीएसचे शिक्षण घेत होता. या तरुणाचा ऐन सक्रांतीच्या सणादिवशी रुमवर तीक्ष्ण हत्याराने खून केल्याचा प्रकार घडला होता. या प्रकरणाचा तपास पोलीसांनी लावला आहे. हा खून मोबाईल गेम आणि यातून झालेल्या आर्थिक व्यवहारातून झाला असल्याचे निष्पण झाले असून प्रदिप निपटे या तरुणाचा हत्यारा हा जिवलग अल्पवयीन रुम पार्टनरच निघाला असल्याने तपासात उघड झाले आहे.



या प्रकरणातील मयत प्रदिप निपटे या तरुणाचा १७ वेळा धरधार हत्याराने वार करत मकर सक्रांती

# ... तर बीड रेल्वेचे उद्‌घाटन आठ दिवसांनी लांबणार

## २३ जणांच्या घरांचा ३ कोटी २० लाखांचा मावेजा आज मिळणार, २३ जण करणार घरे खाली

बीड, (दिव्य न्युज):- येत्या २६ जानेवारी रोजी बीड रेल्वे मार्गाचे आणि स्टेशनचे उद्धाटन करण्याचे नियोजन रेल्वे विभागाने केले होते. मात्र २३ जणांच्या घरांच्या थकलेल्या मावेजामुळे अडचण निर्माण झाली आहे. या २३ जणांचा ३ कोटी २० लाख रूपयांचा मावेजा आज वितरीत केला जाणार आहे. त्यानुसार हा मावेजा मिळताच ते २३ जणही आपले घरे खाली करणार आहेत. घरे खाली होताच राहिलेले रेल्वेचे काम पुर्ण केले जाणार आहे. त्यामुळे २६ जानेवारीचा उद्धाटनाचा कार्यक्रम आठ दिवसांनी लांबू शकतो.

नगर-बीड-परळी रेल्वे मार्ग हा बीड जिल्हावासियांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मागच्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यातील प्रत्येक जण बीड रेल्वेची आतुरतेने वाट पाहत आहे. त्यानुसार बीडपर्यंत या रेल्वे मार्गाचे काम जवळपास पुर्ण झालेले आहे. त्याअनुषंगानेच येत्या २६ जानेवारी रोजी बीड रेल्वे मार्गाचे आणि स्टेशनचे उद्धाटन करण्याचे नियोजन रेल्वे विभागाने केलेले आहे. मात्र बीड परिसरात २३ जणांना आपल्या घराचा मावेजा मिळालेला नाही, वा मावेजापोटी रेल्वेने ३ कोटी २० लाख रूपयांचा निधी राज्य सरकारकडे वर्ग केलेला आहे. मावेजा न मिळाल्यामुळेच अद्याप या २३ जणांनी आपली घरे खाली केलेली नाहीत, त्यामुळे बीड रेल्वे मार्गाचे काम करण्यास अडथळा निर्माण होत आहे. या अडथळयामुळेच रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांची भेट घेवून सदर प्रश्न त्यांच्यासमोर मांडला आहे. त्यानुसार सदर २३ जणांच्या घरांचा मावेजा आज वितरीत केला जाणार आहे, मावेजा मिळताच घरे खाली केली जाणार आहेत. त्यानंतर रेल्वेचे काम पुर्ण केले जाणार आहे. यामुळेच २६ जानेवारीचा उद्धाटनाचा कार्यक्रम एक आठवड्यांनी लांबू शकतो.








# इम्रान खानला पत्नीसह १४ वर्षे जेल

## पीटीआय या पक्षाच्या समर्थकांनी पाकिस्तानी संसदेसमोर केली निदर्शने



इस्लामावाद , (वृत्तसेवा):- अल-कादिर ट्रस्टशी निगडित दोन हजार कोटी रुपयांच्या प्रकरणात भ्रष्टाचार केल्याच्या आरोपांवरून पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान व त्यांच्या पत्नी बुशरा बिबी यांना अनुक्रमे १४ वर्षे व सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा न्यायालयाने शुक्रवारी सुनावली. इम्रान खान यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचा तसेच बुशरा बिबी या गैरव्यवहारांमध्ये सहभागी असल्याचा ठपका न्यायालयाने ठेवला आहे.

भ्रष्टाचारविरोधी न्यायालयाचे न्या. नसीर जावेद राणा यांनी हा निकाल दिला. इम्रान खान यांना १० लाख पाकिस्तानी रुपये (भारतीय चलनात ३ लाख १० हजार रुपये) व बुशरा बिबींना ५ लाख पाकिस्तानी रुपये (भारतीय चलनात १ लाख ५५ हजार रुपये) इतका दंड न्यायालयाने सुनावला आहे. दंड न भरल्यास, इम्रान खान यांना ६ महिन्यांची तर बुशरा बिबींना ३ महिन्यांची अतिरिक्त शिक्षा होईल. अल-कादिर विद्यापीठाच्या जमीन जप्त करावी, असा आदेशही न्यायालयाने दिला आहे.

न्यायालयाने शिक्षा सुनावल्यानंतर इम्रान खान यांच्या पीटीआय पक्षाच्या समर्थकांनी संसदेसमोर निदर्शने केली. इम्रान खान व बुशरा बिबींची सुटका करा, अशी निदर्शकांनी पाकिस्तान सरकारकडे मागणी केली. इम्रान खान यांनी म्हटले आहे की, आमच्याविरोधात दिलेला निकाल हा राजकीय हेतूने प्रेरित आहे. असा निकाल दिल्यामुळे न्यायालयाची प्रतिमा डागाळली आहे.

### लष्करावरील हल्ल्याचा रोष


बहुतांश खटल्यांत इम्रान यांची निर्दोष सुटका झाली किंवा त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे.मात्र, त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी लष्कराच्या इमारतींवर हल्ले केले. त्यामुळे लष्कराचा इम्रान खान यांनी रोष ओढवून घेतला.


# सर सय्यद अहेमद खान स्कूलची यशाची परंपरा कायम

## नांदेड येथील प्रश्न मंजुशामध्ये रासेक अनस महाराष्ट्रात प्रथम

बीड, (दिव्य न्युज):- नांदेड येथील खादिमीने उम्मत यांच्या वतीने दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या प्रश्न मंजुषा परीक्षा मध्ये विद्यार्थ्यांना ६०० प्रश्नांच्या उत्तरांची तयारी करायची होती. सर सय्यद अहेमद खान सेमी इंग्लिश आणि पीपल्स हायस्कूलने नेहमीप्रमाणे आपली परंपरा कायम ठेवत संपूर्ण महाराष्ट्रात पहिला क्रमांक मिळवला आहे.ग्रुप बीमध्ये, इयत्ता ९वी चा विद्यार्थी शेख रासिक अनस वासिक नदीम यांनी १०० पैकी ९८ गुण मिळवले.ग्रुप एमध्ये, पहिला क्रमांक सय्यद अल्मिश यासेर यांनी १०० पैकी ९३ गुण मिळवले. दुसऱ्या क्रमांकावर हफसा रहमान फार्मान यांनी १०० पैकी ९२ गुण मिळवले. शाळेचे सचिव अब्दुल वकील सर आणि पूर्ण स्टाफतर्फे या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.







# वाल्मीक कराडच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३५ एकर शेती

बीड, (दिव्य न्युज):- बीड येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी तसेच मंत्री धनंजय देशमुख यांच्या जवळचा असणारा वाल्मीक कराडवर आता मकोका अंतर्गत गुन्हा दाखल झाला असून पुढील चौकशी व कारवाई सुरू आहे. वाल्मीक कराडची अनेक ठिकाणी मालमत्ता असल्याचे समोर आले आहे. बीड, परळी, पुणे, पिंपरी चिंचवडनंतर आता सोलापूरमध्ये सुद्धा कराडची मालमत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.

वाल्मीक कराडच्या पहिल्या पत्नीच्या नावावर पुण्यात अनेक ठिकाणी मालमत्ता आहे, तसेच त्याची दुसरी पत्नी ज्योती जाधव हिच्या नावावर सोलापूर येथील बार्शी येथे जवळपास ३५ एकर शेती असल्याची माहिती मिळाली आहे. विशेष म्हणजे या शेतात काम करणाऱ्या सालगड्याला गेल्या तीन महिन्यांपासून पगारच दिला नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचे समोर आले आहे.

लातूर जिल्ह्यातील रेणापूर येथील शिंदे माने या कुटुंबाने गेल्या तीन महिन्यांपासून मजुरी न मिळाल्याची खंत व्यक्त केली आहे. बार्शी तालुक्यातील शेंद्री गावात वाल्मीकच्या दुसऱ्या पत्नीच्या नावावर ३५ एकर जमीन आहे. याठिकाणी गेल्या ७ महिन्यांपासून माणिक शिंदे-माने यांचे कुटुंब सालगडी म्हणून काम पाहत आहे. मात्र गेल्या ३ महिन्यांपासून त्यांना पगारच दिला गेला नसल्याची माहिती सालगड्याने दिली आहे. पगार मिळत नसल्याने या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

पान १ वरून

## कृषी साहित्य खरेदीप्रकरणी

निधी मंजूर केला होता. याअंतर्गत स्प्रे पंप व इतर कृषी साहित्य खरेदी करून शेतकऱ्यांना पुरवण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या खरेदीत घोटाळा झाल्याचा दावा केला जात आहे.

शंतनू घाटे या वकिलाने याप्रकरणी नागपूर खंडपीठात एक याचिका दाखल केली आहे. त्यामध्ये घाटे यांनी दावा केला आहे की बाजारातील किंमतीपेक्षा जास्त किंमतीत कृषी साहित्य खरेदी करून कृषी विभागाने कोट्यवधी रुपयांचा घोटाळा केला आहे. घाटे यांनी काही वेळापूर्वी टीव्ही ९ मराठीशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, उच्च न्यायालयात मी अशी जनहित याचिका घेऊन आलो आहे की शासनाने १०३ कोटी रुपयांचे स्प्रे पंप विकत घेऊन लाभार्थी शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. या पंपासाठी शासनाने प्रति लाभार्थी ३,६२५ रुपये इतकी किंमत घेतली आहे. सुरुवातीला या स्प्रे पंपाची किंमत १,५०० रुपये ठेवण्यात आली होती. तर, बाजारात या पंपाची किंमत २,६०० रुपये इतकी आहे. मग इतक्या अधिक किंमतीत हे स्प्रे पंप खरेदी करण्याचं कारण काय? कोणत्या आधारावर ही किंमत वाढवण्यात आली. यात गैरकृत्य झालं असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असल्यामुळे उच्च न्यायालयाने शासनाविरोधात नोटीस काढली आहे.

वकील शंतनू घाटे म्हणाले, आम्ही यासंबंधीची माहिती घेण्यासाठी माहितीच्या अधिकारांतर्गत पत्रव्यवहार केला मात्र, याबाबत आम्हाला कुठलीही माहिती मिळाली नाही. माहिती देण्यास प्रशासनाने टाळाटाळ केली. कृषी विभाग माहिती देण्यास आतादेखील टाळाटाळ करत आहे. दुसऱ्या बाजूला या खरेदीवेळी आयुक्तांनी एक सूचना केली होती की इतक्या किंमती कृषी साहित्य खरेदी करू नका. मात्र कृषी विभागाने त्याकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांनी कोणत्या नोटिशीवर अथवा आधारावर ही खरेदी केली, या खरेदीला मंजुरी दिली ते कळायला मार्ग नाही. आम्ही हा मुद्दा न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला आहे. यावर आता न्यायालयाने त्यांच्याकडे स्पष्टीकरण मागितलं आहे. यावर त्यांनी (धनंजय मुंडे अथवा कृषी विभाग) न्यायालयाला उत्तर दिल्यावर आपल्याला नेमकं कारण कळेल.

## हॉलतिकिटवरही

सुरुवात झाली असून दहावी बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट सोमवारपासून वितरित केले जाणार आहेत. कागदपत्रावर जातीची नोंद चुकली असेल तर पालकांना शिक्षणाधिकारी उपसंचालक कार्यालयातून योग्य ती कागदपत्रे सादर करून तो बदल करून घेता येईल, विद्यार्थ्यांची जातीची नोंद शाळेमध्ये योग्य झाली आहे हे कळण्यासाठी हॉल तिकीट वर जात प्रवर्ग दिला असल्याचा सांगितलं गेलंय. सामाजिक न्याय विभागाला विद्यार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देता यावा, यासाठी दरवेळी जात निहाय आकडेवारी विद्यार्थ्यांची द्यावी लागते. त्यासाठी हॉल तिकिटावर योग्य ती जात प्रवर्ग कळल्यास त्याचा उपयोग होईल, असं बोर्डाकडून सांगण्यात आलंय.

दरम्यान, दहावी बारावी बोर्ड परीक्षेच्या हॉल तिकीटावर जातीचा उल्लेख करण्यात आल्याने बोर्डाच्या या निर्णयावर शिक्षण तज्ञ आणि शिक्षकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. तर बोर्डाने घेतलेला हा निर्णय चुकीचे असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. खर्या अर्थाने विद्यार्थ्यांची ओळख आपण परीक्षांमध्ये झाकत असतो. विद्यार्थ्यांची ओळख परीक्षकाला कळू नये यासाठी रोलनंबर वर सुद्धा आपण स्टिकर लावत असतो. अशातच या निर्णयावर बोर्ड दिलेले स्पष्टीकरण हे न पटण्यासारखं आहे. एक वेळ जातीचा उल्लेख हा निकालावर छापलं असतं तर चाललं असतं. किंबहुना दाखल्यावर जात असताना पुन्हा हॉल तिकीट वर जातीचा उल्लेख करणे हे ही न पटणारे असल्याचे मत शिक्षण तज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केलं आहे.

## समोरील वाहनाच्या

शिवारात झाला. यात सुभाष रतन अंधारे ( ४० ) यांचा जागीच मृत्यू झाला. ते ढाकेफळ येथील सरपंच रतन अंधारे यांचे पुत्र होते.

ढाकेफळ शिवारातील शेतातील पिकाला पाणी देऊन सुभाष रतन अंधारे शुक्रवारी रात्री ८ वाजण्याच्या दरम्यान घराकडे परतत होते. यावेळी शिवरा लगतच्या राष्ट्रीय महामार्गांवर एक नादुरुस्त ट्रॅक्टर व ट्रॉली दुचाकीच्या लेनवर उभी होती. समोरून आलेल्या वाहनाच्या प्रकाश झोतामूळे अंदाज न आल्याने सुभाष समोर उभ्या ट्रॉलीवर धडकले. धडक जोरदार असल्याने गंभीर जखमी सुभाष अंधारे यांचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात मृताचे वडील रतन अंधारे यांच्या खबरीवरून अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार संपत शेंडगे हे करीत आहेत. सुभाष अंधारे यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. सुभाष अंधारे यांच्या पार्थिवावर ढाकेफळ येथे शनिवारी दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

## वाल्मीक कराडला

मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले.

पवनचक्की कंपनींला खंडणी मागितल्या प्रकरणी संशयीत आरोपी वाल्मीक कराड याची चौकशी सुरू आहे. वाल्मीक कराड याच्याविरोधात मकोका गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस कोठडी सुनावण्यात आली. एसआयटीने ताब्यात घेऊन आता चौकशी सुरू आहे. दरम्यान आता या प्रकरणावरुन राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, वाल्मीक कराड ज्या पद्धतीने सरेंडर होतात, ज्या पद्धतीने प्रशासनासमोर जातात. लॉकअपमध्ये त्यांच्या अंगावरील गमजा तसाच राहतो. त्यांच्यापर्यंत तपास आला की जाग्यावर थांबतो. या प्रकरणात त्यांचा सीडीआर तपासला तर सर्व गोष्टी समोर येतील, असा दावाही संदीप क्षीरसागर म्हणाले. या प्रकरणात ज्या पद्धतीने त्यांची संपत्ती बाहेर येत आहे. त्या पद्धतीत ईडीने तपास करायला पाहिजे. ईडीने व्यवहार बघितले तर सर्व गोष्टी समोर येतील, असंही संदीप क्षीरसागर म्हणाले.

त्या भागातील व्यापाऱ्यांसोबत माझी चर्चा झाली. ती लोक आता पहिल्यांदा उघड उघड बोलत आहेत. त्यांच्यावरही अन्याय झाला आहे. आता सर्व गोष्टी बाहेर येतील. पोलीस प्रशासनाने जर ठरवले तर कोणालाही ते अटक करु शकतात. वाल्मीक कराड याचे अमेरिकेपर्यंत हात असू शकतात का? यामागे कोणाचा तरी मोठा हात अशू शकतो, असा दावाही क्षीरसागर यांनी केला.

## मुंडेंनी मंत्रिपदाचाच नव्हे

सहभागी आहे. हे टोळभैरव बीडला बिहारसारखे खराब करत आहे. या लोकांनी हवेत राहू नये. त्यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घ्यायला हवी.

सारंगी महाजन म्हणाल्या की, परळी ही वाल्मीक कराडसाठी बंद नव्हती तर कराडचे माणसं राडा करतील आपले नुकसान करतील म्हणून लोकांनी दुकानं बंद ठेवली. लोकांना तो मध्ये गेला यांचा आनंद आहे. धनंजय मुंडेंलाही आत घाला आणि सरकारी जेवण जेवू द्या.

सारंगी महाजन म्हणाल्या की, अजित पवार धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या बाबतीत योग्यवेळी निर्णय घेतील. माझ्या बाबतीत त्यांनी न्याय मिळून देण्याची खात्री दिली आहे. धनंजय मुंडेंनी स्वत:हून आमदारकीचा राजीनामा द्यायला हवा. धनंजय मुंडेंनी स्वत:ची दहशत संपवण्यासाठी प्रयत्न करायला हवा, असा सल्ला मी त्याला देणार आहे. सामान्य जनतेने त्यांचे सर्व व्यवहार बाहेर काढले पाहिजे.

दरम्यान काही दिवसांपूर्वी मुंडे बहिण-भावाने संगनमताने धमक्या देत कोट्यवधी रुपयांची जमीन अल्प किमतीत खरेदी केल्याचा आरोप काही दिवसांपूर्वी सारंगी महाजन यांनी केला होता. यानंतर आता त्यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली आहे.

वाल्मीक कराडने हत्येच्या दिवशी देखील संतोष देशमुख यांना धमकी दिल्याचा दावा एसआयटीने केला आहे. विशेष म्हणजे संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांनीही वाल्मीक कराडने आपल्या पतीला धमकी दिली होती. त्यामुळे ते तणावात होते, असे पोलिस जबाबात सांगितले होते. आता एसआयटीकडून सुद्धा धमकीचा उल्लेख न्यायालयात करण्यात आल्याने वाल्मीक कराडचा पाय आणखी खोलात गेला आहे.

अवादा कंपनीकडे मागितलेल्या खंडणीत अडथळा ठरल्याने संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आल्याचे सीआयडीने म्हटले आहे. आरोपींनी वारंवार अवादा कंपनीकडे खंडणी मागितली. पण कंपनीने दिली नाही. सुदर्शन घुले, वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांनी अवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना धमकावूनही कंपनीने त्यांना खंडणी दिली नव्हती. अवादा कंपनीची बाजू घेत संतोष देशमुखांनी सुदर्शन घुलेला आव्हान दिले होते. खंडणीला अडथळा ठरले म्हणून वाल्मिक कराड आणि इतर आरोपीनी संतोष देशमुखांची हत्या केली, असा दावा सीआयडीने आणि एसआयटीने कोर्टात केला.

.काही दिवसांपूर्वी सारंगी महाजन म्हणाल्या की, परळीत माझी ६३.५० आर जमीन होती, ३६ आर जमीन फ्रॉड करुन विकली. मला परळीच्या अनुसूया हॉटेलमध्ये बोलावून घेतले. मला तिथून रजिस्ट्रार ऑफिसला नेले. तिकडे माझ्याकडून सही करुन घेण्यात आली. कोणी जमीन घेतली, हे आम्हाला माहिती नाही. तिकडून आम्हाला गोविंद बालाजी मुंडेने घरी नेले, जेवू घातले. त्यानंतर ब्लँक पेपरवर सह्या घेतल्या. त्याला मी विरोध केला असता त्याने म्हटले की, सही केल्याशिवाय धनुभाऊ तुम्हाला परळी सोडून देणार नाहीत, अशी धमकी दिल्याचे त्यांनी म्हटले. याप्रकरणी तोडगा न निघाल्यामुळे अंबाजोगाईच्या दिवाणी न्यायालयात १८ ऑक्टोबर २०२४ रोजी दावा दाखल केला आहे. त्यावर प्रतिवाद्यांना नोटीस बजावली आहे. २५ नोव्हेंबर रोजी पुढील सुनावणी होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सारंगी महाजन म्हणाल्या की, वाल्मीक कराड आणि माझी भेट नाही. कारण वाल्मिकचा हात यात असू शकतो. वाल्मिक कराडचाही या प्रकरणात हात असू शकतो. मला धाक दाखवण्यात आला की परळीत आला तर पंकजा आणि धनंजयला समजलं. गोविंदने मला सांगितलं की पंकजाने तिथे झोपडी बांधली आहे एक जोडपं ठेवलं आहे, गायी गुरं ठेवली आहेत. ती जमीन तुम्हाला मिळणार नाही

## ऑनलाईन गेमध्ये

सणाच्या दिवशीच खून करण्यात आला होता. अखेर या खूनाचा उलगडा करण्यात छत्रपती संभाजी नगर पोलीसांना यश आले आहे. शैक्षणिक वर्षापासून एकाच रुमवर रुम पार्टनर म्हणून कार्यरत असणाय़्रा जिवलग मित्रानेच हा खून केल्याचा तपासात उघड झाले आहे. तर हा खून सहा महिन्यापुर्वीच मोबाईलमधील गेम खेळले आणि यातून आर्थिक व्यवहार झाला. तसेच हा प्रकार प्रदिपच्या रुम पार्टनर असणाय़्राला खटकला तेव्हापासून या दोघांत धूसफूस होती. तर खून करण्याची प्रक्रिया डोक्यात ठेवून अगदी शांतपणे, व्यूरचना आखत तसेच रुमवर कोणताच रुम पार्टनर नसल्याने या संधीचा फायदा घेत आरोपीनी तीक्ष्ण हत्यार ( मोठा चाकू) याने हा प्रदिपचा खून करण्यात आला आहे. तर घटनेची कबूली देखील रुम पार्टनर असणाय़्रा साडे सतरा वर्ष अल्पवयीन आरोपीनी पोलीसांसमोर दिली आहे.तर या खून प्रकरणातील मयत प्रदिप निपटे हा बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील मौजे पिंपरखेड येथील रहिवाशी आहे. तर आरोपी हा अल्पवयीन असल्याने नाव न सांगता तो बीड तालुक्यातील मौजे बोरदेवीचा रहिवाशी असून तो छत्रपती संभाजी नगरमध्ये एनडिए शैक्षणिक प्रवेशाची तयारी करत होता असं सांगण्यात येत असून ते एकमेकांच्या नात्यातील नात्यमधील ते सोयरे होते अस देखील नातेवाईकांकडून सांगण्यात आले आहे. तर हा तपासाचा उलगडा काल झाला असल्याने हा प्रकार ऐकून प्रदिप निपटेच्या वडिलाची तब्येत खालवली होती. त्यांना बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. डॉंक्टरांनी तपासणी करुन त्यांना डिस्चार्ज देखील देण्यात आला असला तरी प्रदिपच्या रुम पार्टनर असलेल्या मुलावर फार विश्वास होता. कारण घटनेच्या वेळी पोलीसांत तक्रार देताना प्रदिपच्या वडिलांनी रुम पार्टनर असणाय़्रावर संशय व्यक्त केला नव्हता.तर या प्रकरणाचा तपास तीन दिवसातच लावण्यात यश आले आहे.

६५ हजारांसाठी हत्या

या खून प्रकरणातील मयत आणि आरोपी हे मोबाईल गेंमच्या आहारी गेले होते. अल्पवयीन आरोपी हा गेंम खेळण्यात पटाईत होता. तर त्याने मयत प्रदिप यांच्या मोबाईलमध्ये गेम खेळत आसताना एक लाख रुपये देखील जिंकले होते. जिंकलेल्या एक लाखापैकी प्रदिप गेंम खेळत आसताना ६५ हजार रुपये हरला होता. या कारणावरुन दोन महिन्यापासून दोघांमध्ये हा वाद सुरु होता. या दरम्यान काही दिवसांपुर्वी प्रदिपचे कॉंलेजमध्ये काही तरुणांमध्ये कडाक्याचे भांडण झाले यावरुनच रुम पार्टनरने प्रदिपच्या खूनाचा कट रचला आणि रुम पार्टनर झेरॉंक्स काढून येई पर्यत मकर संक्रांतीच्या सायंकाळी अल्पवयीन रुम पार्टनरने तब्बल १७ वार करुन प्रदिपची हत्या करण्यात आली आहे. अशी आरोपीने कबुली दिली आहे.